दि.०३/११/२०२५.  प्रकरण क्रं. :– १०१/पीडब्ल्यू/२०१०
साक्षीदार क्रं.:–३  निशाणी क्रं. :– २७
माझे नाव :– राजीव शिवाजीराव चव्हाण.
वय :– ५५ वर्षे. कामधंदा :– सलग्न एलए–४ मरोळ,
सध्या राहणारा :– बी ७०२, एम.आय.डी.सी., अंधेरी.

सरतपास सरकारी अभियोक्ता श्री प्रसाद प्रदिप जोशी यांच्या मार्फत

दि.२० सप्टेंबर २००९ रोजी, स.पो.नि. म्हणून मी पोलीस ठाणे सांताक्रुझ येथे कार्यरत होतो. त्यादिवशी माझ्याकडे दिवसपाळी ठाणे अंमलदारपदाचा कार्यभार होता. त्यापूर्वी माझ्याकडे तक्रारदार मेहूल मेहता यांनी तक्रारी अर्ज केला होता. तक्रारी अर्जामध्ये हेमंत दलाल आणि त्याचा भाऊ यांनी पंडया हाऊस या मिळकतीबाबत बनावट कागदपत्रे तयार केली होती आणि रूपये एक कोटीची मागणी केली असे लिहले होते. मी प्राथमिक चौकशी करून अपराध क्र.३७६/२००९ भा.द.वि. कलम ४६५ वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल केला.

२. आता मला एफ.आय.आर.ची प्रत दाखवली. ती तिच आहे. त्यावर माझी आणि फिर्यादी यांची सही आहे. त्यास आर्टीकल 'बी' देण्यात येत आहे. माझ्या चौकशीमध्ये आरोपी हेमंत दलाल यांनी पंडया हाऊस मधील त्याचे भाडे पावतीमध्ये खोली क्र.१ आणि त्यासमोरील ६८२ चौ.मी. हा मजकूर बनावटरित्या लिहला होता. तसेच आरोपींनी १९९६ साली, मिळकतीचे मालक प्रविणचंद्र दवे यांनी दयाभाई दलाल यांना त्यामिळकतीतील खोली क्र.१ व त्यासमोरील जागा राहायला दिली होती त्यावेळी आरोपीचे वडील दयाभाई दलाल यांच्यासोबत रहात होते अशा आशयाचे बनावट शपथपत्र तयार केले होते.

३. प्रकरणाचा तपास मी केला, मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपी हेमंत दलाल यांना अटक केली. दि.२१/१०/२००९ रोजी,

आरोपींच्या घराची झडती घेवून पंचनामा केला. घरझडतीमध्ये आरोपीच्या घरातून पिवळया व गुलाबी रंगाच्या फाईल काही आक्षेपार्ह कागदपत्रे पंचनामाद्वारे जप्त केली. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनामा आर्टीकल 'ए' येथे आहे.

४. जप्त कागदपत्रांचा तपशील पंचनामामध्ये लिहला आहे. आता मला गुलाबी आणि पिवळया रंगाच्या फाईलमधील कागदपत्रे दाखवण्यात आली, ती तिच आहेत. गुलाबी रंगाच्या फाईलमधील कागदपत्रे पृष्ठ क्र.१ ते क्र.२९९ यांना एकत्रितपणे आर्टीकल 'सी' देण्यात येत आहे, तसेच पिवळया रंगाच्या फाईलमधील कागदपत्रे पृष्ठ क्र.१ ते क्र.१९३ यांना एकत्रितपणे आर्टीकल 'डी' देण्यात येत आहे.

५. तपासादरम्यान आरोपी किशोर दलाल यांनासुध्दा अटक करण्यात आली. माझ्या तपासात आरोपी त्याच्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्सप्रती काढून त्यामध्ये बनावट मजकूर घालून बी.एम. सी.कडे तक्रारी करत होता आणि मालकी सांगून फिर्यादीकडे रूपये एक कोटीची मागणी करत होता, असे निष्पन्न झाले, म्हणून दोषारोप पत्र पाठवले. आरोपी आज कोर्टात हजर आहेत.

सरतपास संपला.

<u>उलटतपास आरोपी क्र.१ करीता स्वत: आरोपी</u>

६. मला फिर्यादीने दिलेल्या भाडे पावत्या आणि कागदपत्रे मी दोषारोप पत्रात लावली आहेत. मला तपासादरम्यान फिर्यादी तसेच आरोपी यांनी कोणतीही मूळ कागदपत्रे दिलेली नव्हती. फिर्यादीने फिर्याद दाखल केली त्यावेळी दि.२०/०५/२००६ रोजीचे, त्याचे मूळ पत्र आणि दि.११/०२/२००६ रोजीची, दवे फूमिलीची पॉवर ऑफ ॲटर्णी

दि.०३/११/२०२५. प्रकरण क्रं. :— १०१/पीडब्ल्यू/२०१०
साक्षीदार क्रं.:—३ निशाणी क्रं. :— २७ पुढे चालू.

दिलेली नव्हती.हे मला माहित नाही की, त्यावेळचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक मधुकर चौधरी यांनी मा. उच्च न्यायालय यांचेकडील क्रिमिनिल रिट पिटीशन क्र.९८/२००९ मध्ये शपथपत्र दाखल करून त्यामध्ये हेमंत दलाल रूम क्र.१ मध्ये, रहातात आणि बिल्डर आणि त्यांच्यामध्ये रिडेव्हलपमेंट करार होत असल्यामुळे मुकूल गोराडीया यांनी खंडणी बाबत खोटी फिर्याद दाखल केली असे सांगितले. तसेच हे मला माहित नाही की, त्या शपथपत्रामध्ये फिर्यादी आणि आरोपी यांच्यातील वाद दिवाणी स्वरूपाचा असल्याचेदेखील नमूद केले होते.

७. फिर्यादीने मला घर मालकाने कोणत्या भाडेकरूला कोणती रूम भाडयाने देवून किती रूपये भाडे होते, हे सांगितले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, क्रिमिनिल रिट पिटीशन क्र.९८/२००९, दि. ०९/०९/२००९ रोजी, डिसमिस होवूनही या केसचा एफ.आय.आर. खोटया पध्द्तीने घेतला. फिर्यादीने मला दि.३१/०७/२००६ रोजीचे, खरेदीपत्र दिले नव्हते. फिर्यादीने मला फिर्याद दाखल झाली त्यावेळी दि. २६/०८/२००८ रोजीचे, पत्रामधून आरोपी हे दयाभाई दलाल यांचे वारस असल्याचे लिहल्याचे सांगितले नव्हते. फिर्यादीने दि. २२/०१/२००९ रोजी, रूम क्र.१ किशोर दलाल, क्र.१५ हेमंत दलालला आणि रूम क्र ११ प्रमोद दवे यांना नोटीस देवून सदरील रूम खाली करण्याबाबत फिर्याद देताना कळवले नव्हते.

८. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादीने घटनेची वेळ, काळ आणि तारीख दिलेली नव्हती. फिर्याद दाखल करण्यास उशीर का झाला,

याचा खुलासा फिर्यादीने फिर्याद देतेवेळी केला नाही. हे म्हणने खरे आहे की, फिर्याद दाखल करते वेळी रूम क्र.१ आणि क्र.१५ बाबत दिवाणी दावा चालू असल्याचे सांगितले नव्हते. फिर्यादीने त्याने केलेल्या लघुवाद न्यायालयातील दाव्यातील आरोपींच्या विरूध्द्‌ची मागणी फिर्यादीमध्ये सांगितली नव्हती. फिर्यादीने मला दावा नंबर—आरए ५७१/१०७१/२००८ चा दावा आरोपींविरूध्द्‌ कब्जासाठी आणि त्यांना पर्यायी जागा देण्याबाबत दाखल केल्याचे सांगितले नव्हते.

९. तपासादरम्यान मी प्रविणचंद्र दवे यांचा जबाब नोंदवला नाही. हे मला माहित नाही की, फिर्यादीविरूध्द्‌ रूम क्र १५ आणि पाच शौचालय पाडल्याबाबत एम.आर.टी.पी. कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादीने दिलेला मूळ तक्रारी अर्ज दोषारोप पत्रात मिळून येत नाही. मी आरोपी हे भिकुभाई आणि दयाभाई दलाल यांचे वारस असल्याबाबत चौकशी केली नाही. आरोपीचे वडील फिर्यादीला बँकेद्वारे भाडे देत होते, असे मला फिर्यादीने सांगितले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, रूम क्र.१ आणि त्याच्यासमोरील मोकळया जागेचे भाडे आरोपींचे वडील बँकेद्वारे प्रविण दवे यांना देत होते. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादीने रूम क्र.१ आणि क्र.१५ हडप करण्यासाठी आरोपींच्याविरूध्द्‌ खोटी केस केली.

१०. पिवळया आणि गुलाबी फाईलमधील कागदपत्रांच्या मजकूरा बाबत मला माहिती नाही. फिर्यादीने मला सिटी सिव्हील कोर्ट यांचेकडील केस क्र.२०४/२००९मध्ये स्टे असल्याबाबत सांगितले

दि.०३/११/२०२५.　　प्रकरण क्रं. :— १०१/पीडब्ल्यू/२०१०
साक्षीदार क्रं.:—३　　निशाणी क्रं. :— २७ पुढे चालू.

नव्हते. हे म्हणने खरे आहे की, आरोपींकडून कोणतीही बनावट भाडेपावती व कागदपत्रे मिळून आले नाहीत. हे म्हणने खरे नाही की, आरोपींनी कोणतीही खोटी कागदपत्रे बनवली नाहीत. हे म्हणने खरे नाही की, कोणताही पुरावा नसताना मी दोषारोप पत्र पाठवले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

उलटतपास आरोपी क्र.२ करीता स्वत: आरोपी
आरोपी क्र.१ यांनी केलेला उलट तपास स्वीकारला.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
3.11.25
(अ. भा. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
७१ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.
दि.०३/११/२०२५.

दि.०३/११/२०२५.
सराद.